न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# उष्माघात टाळण्यासाठी महापालिकेचे नागरिकांना आवाहन

## दुपारी बाहेर पडणे टाळा, पाणी नियमित प्या; आरोग्याची काळजी घेण्याच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरात उन्हाचा तडाका वाढला आहे. त्यामुळे उष्माघाताचा त्रास होऊ शकतो. नागरिकांनी दुपारच्या वेळेच्या तीव्र उन्हात घराबाहेर पडू नये. गरज असल्यास टोपी, छत्री व गॉगलचा वापर करावा. सतत पाणी प्यावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे

उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. घराबाहेर पडताना गॉगल, छत्री अथवा टोपीचा वापर करा. सूर्यप्रकाशापासून वाचण्यासाठी घरातील पडदे आणि झडपांचा वापर करा. उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडिओ, टीव्ही किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करण्यात यावा. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. उन्हात काम करीत असल्यास टोपी, छत्री किंवा ओल्या कपड्याने डोके, मान, चेहरा झाकण्यात यावा



### चक्कर येत असल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या!

» **अशक्तपणा, डोकेदुखी सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास, तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घेण्यात यावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास जठड, घरी बनवण्यात आलेली लस्सी, कैरीचे पन्हे, लिंबू-पाणी, ताक इत्यादीचा वापर नियमित करावा. पुरेसे पाणी प्या, तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्या.**

गुरांना छावणीत ठेवण्यात यावे. त्यांना पुरेसे पाणी पिण्यास देण्यात यावे. शक्य त्या ठिकाणी पक्षी व प्राण्यांना योग्य त्या ठिकाणी पिण्याच्या पाणी ठेवण्यात यावे. नागरिकांसाठी पानपोईची व्यवस्था करावी. घर थंड ठेवण्यासाठी पडदे शटर व सनशेडचा वापर करण्यात यावा. तसेच, रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्यात. पंखे, ओले कपडे याचा वापर करण्यात यावा. थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करण्यात यावे. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. सूर्यप्रकाशाचा संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे. पहाटेच्यावेळी जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा. बाहेर कामकाज करीत असल्यास मध्ये मध्ये विश्रांती घेऊन नियमित आराम करण्यात यावा. गरोदर स्त्रिया आणि आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.

### उन्हात चहा, कॉफीचे सेवन टाळा

» **तीव्र उन्हात अतिकष्टाची कामे करू नका. दारू, चहा, कॉफी आणि कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका. दुपारी 12 ते 3 च्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळा. उच्च प्रथिनेयुक्त तसेच, शिळे अन्न खाऊ नका. लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. गडद घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावी. उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळण्यात यावे. तसेच, मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे व खिडक्या उघडी ठेवण्यात यावी, असा सूचना प्रशासनाने केल्या आहेत.**

# आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते कृष्णानगर येथे 51 फुटी भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण..!

## भव्य सोहळ्याचे ध्वजारोहण हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते तर सचिनभैय्या लांडगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक ११ मधील कृष्णानगर येथे गुरुवारी सायंकाळी देशभक्ती, हिंदुत्व आणि अभिमान यांचा संगम अनुभवायला मिळाला. तब्बल ५१ फुटी भव्य भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. या भव्य सोहळ्याचे ध्वजारोहण हिंदुत्ववादी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते तर सचिनभैय्या लांडगे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. भगव्या ध्वजाने आकाशात झेप घेताच उपस्थित नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट करत



अभिमान व्यक्त केला. या उपक्रमामागे जगदंब प्रतिष्ठान कृष्णानगर यांची संकल्पना असून, स्थानिक नगरसेविका रिटा सचिन सानप आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन सानप यांच्या पुढाकारातून हा सोहळा साकारला गेला.

यावेळी आमदार महेश लांडगे, कामगार नेते सचिन भैय्या लांडगे, नगरसेवक निलेश नेवाळे, नगरसेवक कुंदन गायकवाड, नगरसेवक योगिता नागरगोजे, पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, अमित जावळे, अजय सायकर, महादेव कवितके, अरुण पाडुळे, अजय साने, संतोष ठाकूर, विनोद रोकडे, अशोक खराबे, हिंदुराव पाटील, पोपट हजारे, सुधाकर धुरी, अशोक मगर, अनिल सोमवंशी, ऋषिकेश जाधव, गणेश भुजबळ, पन्नालाल जाधव, सुनीता जगताप, कविता हिंगे यांच्यासह जगदंब प्रतिष्ठानचे सर्व कार्यकर्ते तसेच परिसरातील अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक ११ मधील कृष्णानगर येथे गुरुवारी सायंकाळी देशभक्ती, हिंदुत्व आणि अभिमान यांचा संगम अनुभवायला मिळाला. तब्बल ५१ फुटी भव्य भगव्या ध्वजाचे राष्ट्रार्पण मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडले. या भव्य ध्वजारोहण सोहळ्यामुळे कृष्णानगर परिसरात एक नवीन उत्साह संचारला असून, हिंदुत्व आणि राष्ट्रभक्तीचा संदेश अधिक बळकट झाला अशी भावना नगरसेविका रिटा सानप यांनी व्यक्त केली.

# पिंपळे सौदागरच्या विकासातील मोठा अडथळा दूर

## अनेक वर्षांपासून रखडलेल्या 'ट्रायोज-झूलेलाल टॉवर' रस्त्याचे काम अखेर सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर परिसरातील वाहतुकीसाठी अत्यंत कळीचा मानला जाणारा, मात्र गेल्या अनेक वर्षांपासून विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे प्रलंबित असलेला १८ मीटर 'ट्रायोज-झूलेलाल टॉवर' रस्त्याचे काँक्रिटीकरण कामाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. नगरसेवक शत्रुघ्न काटे, नगरसेविका अनिता काटे आणि नगरसेविका कुंदा भिसे यांच्या अथक प्रयत्नातून आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या रस्त्याचे काम आज प्रत्यक्ष सुरू करण्यात आले.



### अनेक वर्षांची प्रतीक्षा संपली..

**» पिंपळे सौदागरच्या मध्यवर्ती भागातून जाणारा हा रस्ता अनेक गृहप्रकल्पांना जोडणारा मुख्य दुवा आहे. मात्र, जमिनीचे अधिग्रहण, तांत्रिक त्रुटी आणि इतर काही कारणांमुळे या १८ मी रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम प्रलंबित होते. रस्ता अर्धवट असल्याने नागरिकांना धुळीचा त्रास आणि वाहतूक कोंडीचा मोठा सामना करावा लागत होता. ही समस्या सोडवण्यासाठी शत्रुघ्न काटे यांनी महापालिका प्रशासनाकडे वारंवार बैठका घेतल्या आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करून सर्व अडथळे दूर केले.**

या कामाच्या सुरुवातीवर बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले की, "निवडणूक दरम्यान ट्रायोज आणि झूलेलाल टॉवर्स सोसायटी रहिवासी आणि सौदागरच्या नागरिकांना दिलेला शब्द पूर्ण होताना पाहून आज मोठे समाधान वाटत आहे. 'ट्रायोज-झूलेलाल टॉवर' रस्ता हा केवळ सिमेंट-काँक्रीटचा रस्ता नसून तो या भागातील दळणवळणाची 'लाईफलाईन' आहे. अनेक तांत्रिक अडचणींमुळे हे काम रखडले होते, मात्र आम्ही कच खाल्ली नाही. प्रशासनाशी सतत संवाद साधून आणि पाठपुरावा करून आम्ही आज हे काम मार्गी लावले आहे. दर्जेदार आणि जलद गतीने हे काम पूर्ण करून हा रस्ता लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होईल. विकासाचा हा रथ आम्ही असाच पुढे नेत राहू."

रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे स्थानिक सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी आणि रहिवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. भाजप लोकप्रतिनिधींनी दाखवलेली ही 'राजकीय इच्छाशक्ती' पिंपळे सौदागरला अधिक 'स्मार्ट' बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यावेळी उद्योजक संदिप काटे, उद्योजक संजय भिसे, धनंजय भिसे तसेच परिसरातील प्रतिष्ठित नागरिक आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

# मोकाट श्वानांच्या तक्रारींसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ती

## महापालिकेने प्रभाग कार्यालयनिहाय स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोकाट श्वानांसदर्भातील नागरिकांच्या तक्रारी निकाली काढण्यासाठी महापालिकेने प्रभाग कार्यालयनिहाय स्वतंत्र आठ समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे तक्रारींचे वेळेत निरसन होण्यास मोठी मदत होईल, असा दावा पशुवैद्यकीय विभागाने केला आहे.

मोकाट श्वानांनी केलेल्या हल्ल्याबाबतच्या तक्रारींचे निवारण प्रामुख्याने केंद्र स्तरावरून होत असल्याने कार्यवाहीस वेळ लागत होता. अधिकारी नागरिकांसह नगरसेवकांचे फोन उचलत नव्हते. त्यामुळे पशुवैद्यकीय विभागावर रोष व्यक्त केला जात होता. हे ध्यानात घेऊन प्रभाग कार्यालयनिहाय स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.



### समन्वय अधिकारी व संपर्क क्रमांक

- **मदनुरकर इरण्णा – अ प्रभाग – ९१३०५८०७५१**
- **शरद राठोड – ब प्रभाग – ७७७६८१२०९०**
- **राहुल गुलाले – क प्रभाग – ७९७२६०९२७८**
- **निरज हटवार – ड प्रभाग – ७०२०३१४९४३**
- **समीक्षा कुंभार – इ प्रभाग – ९४२१६३२५३८**
- **सुरज शिंदे – फ प्रभाग – ९३७०४४३८१५**
- **निशिगंधा कचवे – ग प्रभाग – ९२८४८०११७७**
- **सुनील कांबळे – ह प्रभाग – ८८८८४४२०४६**

आता प्रभाग स्तरावरच तक्रार निकाली काढली जाईल. नागरिकांनी प्रभाग कार्यालयाच्या हद्दीनुसार संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी. महापालिकेमार्फत ही सर्व कामे भारतीय प्राणी कल्याण मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात येणार असल्याचे उपायुक्त संदीप खोत यांनी सांगितलेशहरातील नागरिकांना मोकाट श्वानांच्या त्रासासंदर्भात तक्रारी मांडण्यासाठी प्रभाग कार्यालय स्तरावरच सक्षम यंत्रणा उभी केली जात आहे. प्रत्येक प्रभाग कार्यालयासाठी स्वतंत्र समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# पुणे मेट्रोचा तिसरा टप्पा रखडला

## 23 किमी चाचणी पूर्ण तरीही प्रवाशांची प्रतीक्षा कायम

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे मेट्रोचा 3 टप्पा अर्थात माण डेपो ते शिवाजीनगर मार्ग हा पुढील दोन महिन्यांत खुला होणार आहे. मात्र, त्यासाठी सर्वच स्टेशन सुरू करण्याचा अट्टहास संचालित असलेल्या खासगी कंपनीकडून केला जात आहे. त्यामुळे आधीच उशिर झालेली मेट्रो रुळावर आणण्यासाठी आता 13 स्टेशन सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यामुळे ढकल स्टार्ट मेट्रो नकोच, असे प्रवाशांचे म्हणणे आहे. तर, मेट्रो प्रशासनाने मार्च अखेरीस काम पूर्ण करण्याचे पत्र दिले आहे.

मेट्रो 3 टप्पा हा मार्ग एप्रिल 2026 अखेरपर्यंत टप्प्याटप्प्याने प्रवाशांसाठी खुला होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये जाणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांचा प्रवास वेगवान आणि सुलभ होणार आहे. त्यातच लाखो आयटी कर्मचाऱ्यांकडून ही मेट्रो बाणेरपर्यंत अथवा जेवढे स्थानक सुरू करण्यास उपलब्ध आहेत, तेथून सुरू करावी, अशी मागणी होती. तत्कालीन आयुक्त योगेश म्हसे यांनी हा मेट्रो टप्पा एप्रिल अथवा मेमध्ये सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट केले होते.



### 23 किमीची चाचणी पूर्ण

**» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) या उन्नत मार्गावर दोन्ही दिशांनी मेट्रोची चाचणी पूर्ण झाली आहे. या दरम्यानची 23 किलोमीटरची मेट्रोची चाचणीदेखील पूर्ण झाली आहे. तसेच, मेट्रो संचलनासाठी एक स्वतंत्र कंपनीदेखील नेमण्यात आली. मात्र, अद्याप मेट्रो धावण्यास मुहूर्त मिळाला नाही. या प्रकल्पाचे सुमारे 92 टक्के स्थापत्यविषयक काम पूर्ण झाले असून, सर्व स्थानके एकाच वेळी सुरू केली जाणार नाहीत. तर, 100 टक्के पूर्ण झालेली स्थानके प्रवाशांसाठी खुली केली जातील. कामे पूर्ण होताच इतर स्थानके या मार्गाच्या जाळ्यात जोडली जाणार आहेत, असे सांगण्यात येत आहे. तथापि, यावर एकमत होत नसल्याने ही मेट्रो प्रत्यक्षता कधी धावणार? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.**

# महापालिकेच्या मालमत्तांचे डिजिटल ट्रॅकिंग

## नव्या नियमावलीनंतर प्रकल्पांना गती; सल्लागार नेमणूक प्रक्रियेला सुरुवात, कोट्यवधींच्या मालमत्तेचे व्यवस्थापन अधिक सक्षम

**पुणे | प्रतिनिधी**

राज्य सरकारने जागावाटप नियमावलीत केलेल्या बदलानंतर महापालिकेच्या ताब्यातील 'ॲमेनिटी स्पेस' आता सार्वजनिक- खासगी भागीदारीतून (पीपीपी) विकसित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. यासाठी सल्लागार नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, महापालिकेच्या सर्व मालमत्तांचे अचूक व्यवस्थापन आणि देखरेख करण्यासाठी स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्याचाही उपक्रम हाती घेतला जात आहे.

बांधकाम नियमावलीनुसार महापालिकेकडे येणाऱ्या 'ॲमेनिटी स्पेस'चा वापर नागरिकांसाठी विविध सार्वजनिक सुविधा उभारण्यासाठी केला जातो. यामध्ये शाळा, रुग्णालये, क्रीडा संकुले, मंडई, अग्निशामक केंद्रे, सांस्कृतिक केंद्रे अशा सुमारे 21 प्रकारच्या सुविधा उभारल्या जातात. आतापर्यंत या सर्व सुविधांचा विकास महापालिकेच्या निधीतून करण्यात येत होता, ज्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्चही होत होता.

या प्रकल्पांच्या उभारणीसाठी लागणारा खर्च मोठा असल्याने अनेक सुविधा पूर्णत्वास जाण्यास पाच ते सहा वर्षांचा कालावधी लागत होता. शिवाय, या जागांवर कोणती सुविधा उभारावी, यासाठी नगरसेवकांकडून सातत्याने पाठपुरावा केला जात होता. मात्र, गेल्या काही वर्षांत उभारलेल्या सुविधांवर झालेला खर्च आणि त्यावर आकारण्यात येणारे भाडे यामुळे अनेक ठिकाणी या सुविधा वापराविना पडून राहिल्या आहेत. काही ठिकाणी सामाजिक संस्थांना संयुक्त प्रकल्पांतर्गत या जागा देण्यात आल्याने सर्वसामान्य नागरिकांवर वापराबाबत निर्बंधही आले आहेत. परिणामी, कोट्यवधींचा खर्च करून उभारलेल्या सुविधा महापालिकेसाठी आर्थिक बोजा ठरत असल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

याच पार्श्वभूमीवर सुमारे पाच वर्षांपूर्वी 'ॲमेनिटी स्पेस'चा पीपीपी तत्त्वावर विकास करण्याचा प्रस्ताव प्रशासन आणि तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी पुढे आणला होता. मात्र, 2008 च्या जागावाटप नियमावलीत अशा प्रकारच्या विकासाला परवानगी नसल्याने ती योजना विरोधामुळे अमलात येऊ शकली नाही. आता 2023 मध्ये नियमावलीत करण्यात आलेल्या बदलामुळे पीपीपी तत्त्वावर विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुसार, प्रत्येक जागेच्या स्वरूपानुसार कोणत्या सुविधा विकसित कराव्यात, याचे नियोजन करून सल्लागाराच्या मदतीने हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.

शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या 'ॲमेनिटी स्पेस'चा पीपीपी तत्त्वावर विकास करण्याचे नियोजन करण्यात आले असून, त्यासाठी 2023 च्या सुधारित नियमावलीचा आधार घेतला जाणार आहे




### पीपीपी मॉडेलची अंमलबजावणी

» महापालिकेच्या 'ॲमेनिटी स्पेस'चा विकास सार्वजनिक-खासगी भागीदारी (PPP) तत्त्वावर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन नियमावलीमुळे या प्रकल्पांना कायदेशीर मार्ग मोकळा झाला आहे. सल्लागार नेमून प्रत्येक जागेच्या स्वरूपानुसार सुविधा विकसित करण्याचे नियोजन केले जात आहे. यामुळे प्रकल्पांची अंमलबजावणी जलद होऊन महापालिकेवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

### महापालिकेच्या मिळकतींची सद्यःस्थिती

- » ॲमेनिटी स्पेस : 912
- » भवन विभागाकडील व्यावसायिक गाळे : 372
- » निवासी गाळे आणि सदनिका : 4,311
- » भूमी जिंदगीकडील मालमत्ता : 1,552

### व्यवस्थापनात तंत्रज्ञानाचा वापर

» महापालिकेच्या सर्व मालमत्तांचे अचूक व्यवस्थापन करण्यासाठी स्वतंत्र सॉफ्टवेअर विकसित करण्यात येणार आहे. यामुळे मालमत्तेची माहिती, देखरेख आणि वापर अधिक पारदर्शक व सुलभ होईल. पूर्वी अनेक सुविधा वापराविना पडून राहत असल्याने आर्थिक बोजा वाढत होता. आता तंत्रज्ञानाच्या मदतीने नियोजन सुधारून सुविधा अधिक परिणामकारकपणे नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे.

# मेट्रो मार्गिकेसाठी पीएमआरडीए ॲक्शन मोडवर...

## हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणारी शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मेट्रो मार्गिकेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. हे काम मे अखेर पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) करण्यात आले आहे.

मेट्रो भवन प्रकल्पाच्या उद्घाटनावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मे महिन्यात मेट्रो मार्गिकेची प्रवासी वाहतूक सुरू करण्याची घोषणा केली होती. या पार्श्वभूमीवर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो मार्गिकेची पाहणी करून प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेतला. चौधरी यांनी या मार्गिकेवरील २३ स्थानकांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी महानगर मुख्य अभियंता रिनाज पठाण आणि 'पीआयटीसीएमआरएल'चे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिलकुमार सैनी उपस्थित होते.

'कामाचा वेग वाढवताना सुरक्षितता आणि गुणवत्तेशी कोणतीही तडजोड करू नका,' अशी सूचना चौधरी यांनी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिली. त्यांनी २३.२ किलोमीटरच्या संपूर्ण मार्गिकेची पाहणी केली. केवळ कागदोपत्री अहवालावर अवलंबून न राहता, त्यांनी प्रत्यक्ष कामाचा दर्जा, तांत्रिक अडचणी आणि स्थानकांची सद्यस्थिती जाणून घेतली. पहिल्या टप्प्यात १२ स्थानके कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यादृष्टीने कामाला गती देण्याचे आदेशही चौधरी यांनी दिले. हिंजवडीतील वाहतूक कोंडीमुळे आयटी कर्मचाऱ्यांना होणारा मनस्ताप कमी करण्यासाठी ही मेट्रो धावणे आवश्यक आहे.

मेट्रोमुळे खासगी वाहनांवरील ताण कमी होऊन शिवाजीनगर ते हिंजवडी हे अंतर अवघ्या काही मिनिटांत पार करणे शक्य होईल. सध्या प्रकल्पाचे ९४.२० टक्के काम पूर्ण झाले असून, सिग्नलिंगची तांत्रिक चाचणी सुरू आहे. तसेच आरडीएसओ आणि सीएमआरएस तपासणीची प्रक्रियाही पूर्ण झाली आहे.



### मेट्रो मार्गिका अंतिम टप्प्यात

» हिंजवडी आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाची ठरणारी शिवाजीनगर–हिंजवडी मेट्रो मार्गिका अंतिम टप्प्यात आली आहे. पीएमआरडीएकडून मे अखेरपर्यंत प्रवासी वाहतूक सुरू करण्याचे नियोजन आहे. सध्या ९४ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले असून सिग्नलिंग चाचण्या सुरू आहेत. पहिल्या टप्प्यात १२ स्थानके सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या मेट्रोमुळे वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवास अधिक जलद आणि सोयीस्कर होणार आहे.

# टीडीआरवरून सभागृहात खडाजंगी; नगरसेवकांचा संतापाचा स्फोट

## फायली महिनोनमहिने प्रलंबित ठेवल्याचा आरोप; 90 दिवसांत टीडीआर देण्याचा प्रशासनाचा दावा

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या सभागृहात बुधवारी टीडीआरच्या मुद्दयावर अक्षरशः संतापाचा स्फोट झाला. जागा देण्यासाठी जमीनमालक तयार असतानाही अधिकाऱ्यांकडून फायली मुद्दाम सहा सहा महिने अडवून ठेवल्या जात असल्याचा गंभीर आरोप नगरसेवकांनी करत प्रशासनाला धारेवर धरले. डीपी रस्त्यांच्या कामांना विलंब होण्यामागे हीच दिरंगाई कारणीभूत असल्याचा ठपका ठेवत, टीडीआर वितरणात पारदर्शक आणि वेळबद्ध धोरण तातडीने लागू करण्याची जोरदार मागणी करण्यात आली.

शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले असून, मुख्य रस्त्यांवरील ताण कमी करण्यासाठी आणि उपनगर व नव्याने समाविष्ट भागांमध्ये रस्ते उभारण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्याच अनुषंगाने प्रस्तावित डीपी रस्त्यांवर चर्चा करताना हा विषय तापला. नगरसेवकांनी आरोप केला की, काही नागरिक तत्काळ जागा देतात त्यांना कमी मोबदला दिला जातो, तर काही प्रकरणांत दिरंगाई करणाऱ्यांना अधिक मोबदला देण्याची तयारी दाखवली जाते. यामुळे संपूर्ण प्रक्रियेत विसंगती निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर, टीडीआरची प्रक्रिया सुलभ करून ती वेळबद्ध करण्याची मागणी करण्यात आली. प्रशासनाने 90 दिवसांत टीडीआर देण्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात सहा महिने किंवा त्याहून अधिक कालावधी लागत असल्याची तक्रार नगरसेवकांनी केली. फायली मुद्दाम अडवून ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. तसेच 'एक खिडकी' यंत्रणा सुरू करून प्रक्रिया पारदर्शक आणि जलद करण्याचा आग्रह धरला गेला.

सभागृहाचे कामकाज सुरू होताच सुमारे 30 हून अधिक नगरसेवकांनी लक्षवेधी मांडत शहरासह उपनगर आणि समाविष्ट गावांमधील डीपी रस्त्यांचा प्रश्न उपस्थित केला. या चर्चेदरम्यान टीडीआरचा मुद्दा विशेषतः गाजला.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी यापूर्वीच टीडीआर प्रक्रियेला गती देण्यासाठी स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, प्रस्तावाच्या टप्प्यांची संख्या कमी करणे, तांत्रिक अडचणी दूर करणे आणि निश्चित कालमर्यादेत प्रकरणे निकाली काढणे यावर भर देण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात प्रस्ताव दाखल झाल्यानंतर विधी विभागाकडून 45 दिवसांत कायदेशीर बाबींची पूर्तता केली जाणार आहे. त्यानंतर त्रुटी दुरुस्तीसाठी 90 ते 120 दिवसांचा कालावधी निश्चित करण्याचा विचार आहे.




### टीडीआर प्रक्रियेत बदलांची प्रशासनाची तयारी

**» महापालिकेकडे टीडीआरसाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर मंजुरी मिळण्यास मोठा विलंब होत असल्याची तक्रार सातत्याने होत होती. अनेकदा फायली विनाकारण प्रलंबित ठेवण्याचे प्रकार घडत असल्याचेही समोर आले. तसेच प्रस्ताव दाखल करताना सुमारे 40 प्रकारची कागदपत्रे सादर करावी लागत असल्याने प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची ठरत होती. आता ही कागदपत्रे निम्म्यावर आणण्याचा निर्णय घेतला असून, प्रक्रिया सुलभ करण्यावर भर दिला जात आहे.**

> **डीपी जाहीर झाल्यानंतरही वर्षानुवर्षे कामे सुरू होत नाहीत. जागा ताब्यात घेतल्यानंतरही टीडीआर वेळेत दिला जात नाही. काही ठिकाणी अतिक्रमणे वाढली आहेत. टीडीआरसाठी 'एक खिडकी' यंत्रणा आणि ऑनलाइन प्रक्रिया सुरू करावी. अनेक प्रकरणांत फायली चार-पाच वर्षे प्रलंबित राहतात. वेळेत टीडीआर मिळत नसल्यामुळे प्रक्रियेबाबत शंका निर्माण होत आहेत.**
>
> **- प्रशांत जगताप, नगरसेवक, काँग्रेस**

> **सर्व कागदपत्रे पूर्ण असल्यास 90 दिवसांत टीडीआर देण्याचा प्रयत्न केला जाईल. विलंबामुळे नागरिक रोख मोबदल्याची मागणी करतात. मात्र, त्याला मर्यादा आहेत. त्यामुळे टीडीआर वेळेत देण्यासाठी नियमावली तयार करण्याचा विचार आहे. तसेच जाणीवपूर्वक विलंब करणाऱ्यांवर कारवाई केली जाईल. डीपी रस्त्यांबाबत सविस्तर अहवाल तयार करून पुढील कार्यवाही केली जाईल.**
>
> **- अनिरुद्ध पावसकर, शहर अभियंता, पुणे महापालिका**

---

# काटेवाडीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची सुनेत्रा पवार यांच्याशी भेट; मदतीचे आश्वासन

## अवकाळी पावसाने शेती उद्ध्वस्त; पंचनामे करून त्वरीत मदतीचे प्रशासनाला निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट कोसळले असून, या पार्श्वभूमीवर काटेवाडी येथील निवासस्थानी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची प्रत्यक्ष भेट घेत आपल्या नुकसानीची व्यथा मांडली. या भेटीत शेतकऱ्यांनी पिकांच्या झालेल्या हानीचे तपशीलवार वर्णन करत तातडीने मदतीची मागणी केली.

यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी शेतकऱ्यांच्या समस्या शांतपणे ऐकून घेत त्यांना धीर दिला. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असून कोणत्याही परिस्थितीत नुकसानग्रस्तांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही.

दरम्यान, पवार यांनी दूरध्वनीवरून जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याचे आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत पोहोचवण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

अवकाळी पावसासोबत आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे काढणीस आलेल्या गहू, ज्वारी यांसारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी गारपिटीमुळे पिके जमिनीदोस्त झाली असून, आंब्याचा मोहर गळून पडल्याने बागायतदारांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. द्राक्षबागांनाही या पावसाचा फटका बसल्याने उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शेतकऱ्यांनी सांगितले की, आधीच वाढत्या खर्चामुळे शेती अडचणीत असताना अवकाळी पावसामुळे उभ्या पिकांचे नुकसान झाल्याने मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाकडून तातडीची आर्थिक मदत मिळणे अत्यंत गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री पवार यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या की, नुकसानग्रस्त भागांचे त्वरीत पंचनामे पूर्ण करून प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत, जेणेकरून शेतकऱ्यांना शक्य तितक्या लवकर मदत दिली जाईल. तसेच मदत प्रक्रियेत कोणतीही दिरंगाई होऊ नये, याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी, असेही त्यांनी बजावले.



### शेतकऱ्यांना दिलासा

**» पुणे जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी काटेवाडी येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेत आपल्या अडचणी मांडल्या. पवार यांनी शेतकऱ्यांना धीर देत शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून तातडीने पंचनामे करून मदत देण्याचे निर्देश दिले. गहू, ज्वारी, द्राक्ष व आंबा पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.**